## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : २४/०६/२०२५

**विभागीय राज्य परिवहन कार्यालय नांदेड येथे नेमणुकीस असलेले कामगार अधिकारी लक्ष्मीकांत गवारे यांनी विभागीय चौकशी मध्ये शिक्षा कमी करून दिल्याचा मोबदला म्हणुन ७०००/-रूपयांची लाच स्विकारण्यास सहमती दर्शविल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
|---|---|
| पोलीस ठाणे | पो.स्टे भाग्यनगर जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.न.३५६/२०२५ कलम ७ A भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २३.०६.२०२५ चे २०.३८ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुददा व पत्ता | श्री.लक्ष्मीकांत विठ्ठलराव गवारे, पद – कामगार अधिकारी, नेमणूक विभागीय राज्य परिवहन कार्यालय नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,००० /– रूपये लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली आहे. |
| लाच स्विकारली रक्कम | — |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे विरूध्दच्या विभागीय चौकशी मध्ये शिक्षा कमी करून दिल्याचा मोबादला म्हणून आरोपी लोकसेवक लक्ष्मीकांत गवारे यांनी श्री.क.बा.भारती, पद – विभागीय वाहतूक अधिकारी, राज्य परिवहन विभाग, नांदेड यांचे नावे तक्रारदार यांचेकडे ७,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिनांक ०२/०५/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.<br>दिनांक ०८/०५/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता यातील लोकसेवक गवारे यांनी तक्रारदार यांचेकडे श्री.क.बा.भारती, पद – विभागीय वाहतूक अधिकारी, राज्य परिवहन विभाग, नांदेड यांना देण्यासाठी म्हणून तक्रारदार यांचेकडे ७,०००/– रूपयाची लाचेची मागणी केली. दिनांक ०२/०६/२०२५ व दिनांक १७/०६/२०२५ रोजी सापळा कारवाई आजमावली असता सापळा कारवाई यशस्वी झालेली नाही.<br>त्यानंतर दिनांक २३/०६/२०२५ रोजी सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक गवारे यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्वीकारलेली नाही. करीता लोकसेवक यांचे विरुध्द पोस्टे भाग्यनगर येथे गु.र.नं. ३५६/२०२५ कलम ७ A भ्र.प्र.अधिनियम १९८८ प्रमणे लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.



| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क क्रमांक :– 02462–253512<br>टोल फ्री क्रमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |



पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड